# संपादक परिचय



नाव : प्रा. डॉ. भास्कर श्रावण गायकवाड

शै.पात्रता : एम.ए.,बी.एड्.,नेट,सेट,पीएच्.डी.

मराठी विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा. जि. लातूर

प्रकाशित ग्रंथरचना :

- आदिवासी भिल्लांची गाणी
- विचारांचे अमृतकणः व्हाट्सपायन

पुरस्कार :

- इन्साचा "विद्याभूषण पुरस्कार" २०१०
- महाराष्ट्र शि.समितीचा "उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार" २०१५
- म.फु.शि.परिषद, महाराष्ट्राचा राज्यस्तरीय "समाजरत्न नागरी पुरस्कार" २०१९

- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोध निबंध वाचन
- लहू शक्ती या मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून कार्य
- महाराष्ट्र महाविद्यालयाच्या "शिवनेरी" या वार्षिक अंकाचे संपादन

"माझे सन्माननिय मित्र श्री. मुन्शी म्हणतात की, भौतिक लाभाच्या वाटपाचा प्रश्न असता तर सीनेटवर जमात निहाय प्रतिनिधित्वाच्या तत्वाचा त्यांनी सहज स्विकार केला असता, परंतु मी त्यांना जाणीव करून देऊ इच्छितो की, शिक्षण हा सर्वात महत्वाचा भौतिक लाभ आहे. याची मागासवर्गीयांना जाणीव झाली आहे. आमच्यासाठी शिक्षण हा सर्वात महत्वाचा भौतिक लाभ आहे. त्याकरीता आम्ही तीव्र संघर्षासाठी तयार आहोत. त्यासाठी आम्ही कोणत्याही प्रकारच्या भौतिक लाभाचा त्याग करु शकतो. या संस्कृतीने उपलब्ध करून दिलेल्या लाभाचा त्याग करावयाची आमची...तयारी आहे पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाच्या हक्कांचा आम्ही त्याग करावयास तयार नाही."

(दि.०५ ऑक्टोबर १९२७- मुंबई, मुंबई विधिमंडळातील मुंबई विद्यापीठ कायदा दुरूस्ती विधेयकावरील चर्चेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणातून.)

विद्यावती प्रकाशन, लातूर

१०६, ओंकार कॉम्पलेक्स-अ, खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर. मो. ९४२१४८६९३५

ISBN 978-93-83411-95-5

978-93-83411-95-5

# प्रेरणा महामानवाची

डॉ.भास्कर गायकवाड





Scanned by Scanner Go

प्रेरणा महामानवाची
लेखक :- डॉ. भास्कर गायकवाड
ISBN 978-93-83411-95-5
विद्यावती प्रकाशन
१०६, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७
© सर्व हक्क संपादकाधिन
: प्रथम आवृत्ती :- १४ एप्रिल २०१९
: मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर
अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्यूटर, लातूर
मुखपृष्ठ रेखाटन :- विरु गुळवे ८६००८८११२७
मूल्य : १२०.०० रुपये
*प्रस्तूत ग्रंथातील मते ही त्या त्या लेखकांची आहेत. त्यांच्या मताशी संपादक मंडळ संबंधी प्रकाशन, मुद्रक व वितरक सहमत असेलच असे नाही

Phone: (0
Fax : (0
Ref: E
To,
01)
02)
03)
04)
05

Scanned by Scanner Go

मोठा गाडा आपल्या कुवतीनुसार, शक्तीनुसार १९५६ पर्यंत ओढत आणला. या गाड्याला पुढे घेऊन जाण्याचे अनेक मार्ग बाबासाहेबांनी आपल्याला दाखवून दिलेले आहेत. त्या मार्गाने हा गाडा पुढे चालतो आहे का ? या प्रश्नाचे उत्तर अनुयायांनी स्वतःला विचारावे व आत्मपरिक्षण करावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जी एकी अपेक्षित होती ती आज आहे का? एकी नसल्यामुळे ताकत विभागली गेलेली आहे. असे कवी प्रकाश मोगले यांना वाटते. एका विद्रोही पण विचार करण्यास भाग पाडणाऱ्या "उपाय" कवितेत ते म्हणतात,

"काल मला पिपळाच्या झाडाखाली बाबासाहेब भेटले,
बुध्दाच्या पुतळ्यासमोर डाव्या हाताने बाण मारतांना
मी त्यांना सहज विचारले, "कुणाला बाण मारता बाबासाहेब ?
अन् का कायदा हातात घेता?
आमच्या देशात लोकशाही आहे अन् कायदयाचे राज्य आहे."
तेव्हा ते पचकन् महया तोंडावर थुंकले अन् गरजले,
"सवलतीच्या चतकोर तुकडा खाऊन सुस्तावलेल्या मुर्दाडांनो,
कुढं आहे चवदारचे पाणी?
कुणाची आहे पेटलेली वाणी ? सारेच कसे थंड आहे सारेच कसे षंढ आहे.
म्हणूनच इथले गांडू बलदंड आहेत."
गडबडलो, हाडबडलो, उलगडलो,

"एकलव्याची शपथ बाबा ! युगायुगाच्या अत्याचाराला पुरून उरणारे आम्ही नामर्द नाही आहोत, दोष एकच आहे हो आमचा, आम्ही एक नाही आहोत."
तेव्हा बाबासाहेब समुद्रासारखे गरजले,

" बिळाबिळात बसलेल्यश अस्सल नागांनो पेटून उठा फुत्कार टाका, फक्त एकदाच, एकच करा, एकजूटीने मरा, एकजूटीने मारा,

अरे तरवारीवर नसीब घासणारे इतिहास बदलत असतात नवा घडवत असतात."

या कवितेतून प्रकाश मोगले यांनी कडवे सत्य प्रतिपादले आहे. हे आजिबात नाकारता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जो एकत्रित समाज अपेक्षित होता. तो आज दिसत नाही. त्यामुळेच अन्याय अत्याचारात वाढ झालेली आहे असे कविला वाटते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्तीचा, संघटीत होण्याचा, समतेचा, अन्यायाविरूध्द लढण्याचा जो विचार मांडलेला आहे तो विचार घराघरापर्यंत पोहचविण्याची गरज आहे. बाबासाहेबांच्या हा विचाराचा ध्वज खांदयावर घेऊन मरेपर्यंत हे कार्य करणार आहे असा विचार संध्या रंगारी यांनी आपल्या कवितेत मांडलेला आहे. त्या म्हणतात,

"बाबाचा ध्वज माझ्या खांदयावर हाय
त्यांचा संदेशा मला घरोघरी पोहचवायचा हाय
म्हणूनच; म्या तशी मरणार नाही
अन्यायावर आघात करणार हाय"

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून निर्माण झालेली ही उर्जा समाजपरिवर्तनासाठी सज्ज झालेली आहे असे दिसते. ज्या जातीयतेच्या उच्चाटनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपली हयात घालवली ती जातीयता नष्ट झालेली आहे असे आजही छातीठोकपणे सांगता येत नाही. ज्या सडक्या मेंदूमध्ये जातीयतेचा प्रश्न निर्माण होतो, त्याला त्याची जागा दाखवून देण्याचे काम कवयित्री कविता मोरवणकर यांनी केले आहे. आपल्या मुक्ता या काव्यसंग्रहातील एका कवितेत त्या म्हणतात,

"तू जेव्हा, विचारीलस मला माझी जात
कुरूप वाटले मला तुझे शब्द
खरे तर जातीची लाज मला कधी वाटली नाही
पण, तुझ्या सडक्या मेंदूतून जात परागंदा झाली नाही याचीच खंत वाटली"

जातीचा उल्लेख करून हिन दर्जाची वागणूक देणाऱ्यांना धडा शिकविण्याच सामर्थ्य आंबेडकरी विचाराच्या कवितेमध्ये आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही मानवमुक्तीची चळवळ भविष्यातील साहित्यीकांना प्रेरणा देऊन गेली म्हणूनच मानवी कल्याणाची ही चळवळ दलित, आदिवासी कवींनी जोमाने पुढे रेटलेली दिसते.

डॉ.भास्कर गायकवाड
९४०३२५०५४६

◈ ◈ ◈



Scanned by Scanner Go

प्रेरणा महामानवाची
लेखक :- डॉ. भास्कर गायकवाड

ISBN 978-93-83411-95-5

विद्यावती प्रकाशन
१०६, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

© सर्व हक्क संपादकाधिन

: प्रथम आवृत्ती :- १४ एप्रिल २०१९

: मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्यूटर, लातूर

मुखपृष्ठ रेखाटन :- विरु गुळवे ८६००८८११२७

मूल्य : १२०.०० रुपये

*प्रस्तृत ग्रंथातील मते ही त्या त्या लेखकांची आहेत. त्यांच्या मताशी संपादक मंडळ संबंधी प्रकाशन, मुद्रक व वितरक सहमत असेलच असे नाही

## संपादक मंडळ

मुख्य संपादक
डॉ.भास्कर श्रावण गायकवाड
मराठी विभाग प्रमुख
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा जि. लातूर

संपादन सदस्य
डॉ.बालाजी गायकवाड
आयु. दिलीप सातपुते
आयु.एम.आर.कांबळे
आयु.राजाराम कांबळे
आयु.भास्कर सुरवसे

Scanned by Scanner Go

०९. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अस्पृश्यता निवारण ........... ७६
स्वाती कांबळे

१०. विद्रोही कविता : डॉ. बाबासाहेब
आंबेडकरांची प्रेरणा ........... ८३
डॉ.बी.एस.गायकवाड

११. एक युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्व :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर. ........... ८८
यास्मिन तांबोळी

१२. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची काही वचने ........ ९०
रोहीत गायकवाड


काव्य विभाग


१३. मूकनायक ........... ९२
पंडीत कांबळे

१४. जा विहारी ........... ९२
पंडीत कांबळे

१५. बौध्द प्रतिके ........... ९३
पंडीत कांबळे

१६. आम्रपाली ........... ९३
पंडीत कांबळे

१७. संकल्प कर्तव्याचा ........... ९४
प्रा.रोहीत बनसोडे

१८. माता रमाई ........... ९५
प्रा.रोहीत बनसोडे


## १.
## भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

भारतातील ब्रिटिशांच्या राजकिय क्षेत्रातील प्रवेशाने पारंपारीक जुनी राज्यव्यवस्था नष्ट होऊन कायदयाचे प्रभूत्व व समान नागरिकत्व यावर आधारीत इंगजांची सुनियंत्रित व शिस्तबध्द राज्यपध्दती अंमलात आली: ब्रिटिशांच्या राज्यव्यवस्थेचे अनेक साधक बाधक असे भारतीयांसाठी परिणाम घडून आलेत. राजकिय यंत्रणेत जसे स्थित्यंतरे घडून आली तसेच भारतीय सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनमानातही मूलगामी असे बदल घडून आले. एकीकडे हे बदल घडून येत असतांनाच भारतीयांच्या राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनावर इंग्रजांचे प्रभूत्वही प्रस्थापित झाले होते. त्यामुळेच भारतीय इंगजांच्या पारतंत्र्यात अडकले होते. पारतंत्र्य याचा अर्थच मुळात जीवनाच्या विविध क्षेत्रात दुसऱ्याचे किंवा सत्ताधारी वर्गाचे प्रभूत्व असणे होय. अर्थात भारतीयांसाठी पारतंत्र्याची संकल्पना काही नवी नव्हती, परंतु इंग्रज सत्तेने भारतातील पुर्वाश्रमीच्या राजकीय, सामाजिक वा इतर अन्य क्षेत्रातील सत्ताधारी वर्गालाही त्यांच्या अधिकारापासून वंचित करून त्यांच्यावरही पारतंत्र्य लादले होते. १९ व्या शतकात भारतीयांमध्ये प्रथमतः ही पारतंत्र्याविषयीची जाणिव निर्माण झाली. विशेषतः १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ही भावना अधिक गतिमान होत चालली होती. याशिवाय इंगजी सत्तेमुळे पाश्चात्य ज्ञानाशी भारतीयांचा संपर्क होऊन सामाजिक- धार्मिक क्षेत्रातही सुधारणांचे वारे वाहू लागले होते. इंगजी सत्तेप्रमाणेच सामाजिक व्यवस्थेमध्येही असलेली प्रभूत्वाची भावना व त्यातून निर्माण झालेली सामाजिक विषमता यासंदर्भातील आत्मभान भारतातील प्रारंभिच्या उच्चविद्याविभूषित वर्गामध्ये निर्माण झाले. त्यातूनच सामाजिक सुधारणांचा आग्रह या वर्गाने लावून धरला. त्यामुळे भारतात एकाच वेळी राजकिय व सामाजिक सुधारणांना सुरवात झाली. राजकिय व सामाजिक सुधारणा चळवळ



Scanned by Scanner Go

## विद्रोही कविता : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा



Scanned by Scanner Go

फोडण्याचे काम १९९० नंतरच्या कवींनी केले.

कवि यशवंत मनोहर आपल्या "उत्थानगुंफा" या कवितेत आपली आक्रमक भूमिका मांडतांना म्हणतात,

"काळ बदलला आहे, आपल्या सवयी आपण बदलल्या पाहीजेत,
सहज कापला जाईल हा पिंजरा, आपण फक्त करवती झाले पाहीजे,
वाटा निखाऱ्यांच्या आहेत , आपण प्रभंजन तेवढे व्हायला हवे,
वस्त्या भडकू शकतात क्रांतीने, आपणच व्हॉल्टेअर व्हायलय हवे."

आपल्याला जर वास्तव चित्र बदलायचे असेल, पिंजरा तोडायचा असेल तर करवतीसारखे आपले विचार झाले पाहीजेत. असे धारदार विचार झाल्याशिवाय अन्यायरुपी पिंजरा आपल्याला कापता येणार नाही. म्हणून अन्यायाला विरोध करण्यासाठी चांगले विचार लोकांपर्यंत पोहचविण्याची गरज आहे.

समाजव्यवस्थेने दलित समाजावर नेहमीच अन्याय केलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने सर्वच मिळाले.परंतु या मिळाल्याचा आनंद मात्र समाज व्यक्त करू देत नाही. ही समाज व्यवस्था समजून घेणे अत्यांत आवश्यक आहे. समोर वेगळेच बोलणे आणि पाठीमागे कटकारस्थान करणे ही रित समजून घेण्याचा प्रयत्न दलित समाजाने करावा असा विचारच जणू काही लोकनाथ यशवंत यांनी आपल्या कवितेतून सांगितलेला आहे. "घागर मे सागर" असा आंबेडकरी विचार मांडण्यात पटाईत असलेल्यां लोकनाथ यशवंतांनी कमी शब्दात प्रस्थापित समाज व्यवस्थेचे चित्रण आपल्या " बोकड" या कवितेत मांडलेले आहे. ते म्हणतात,

"व्यवस्थेने कपाळाला टिळा लावून
पोटभर घास दिला वरून,
अदबीने गळयात हार टाकून वंदन केले
आणि वाजतगाजत वरातही काढली
मानसन्मानाच्या गुंगीतच होतो की,
सुरी मानेतून आरपार निघाली."

जाती पाती नाकारून सर्वांनी शिक्षणाची कास धरली पाहीजे, असे बाबासाहेबांना वाटत होते. दारिद्रय , गरीबी यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण . अस्पृश्य समाज शिक्षित झाल्याशिवाय त्यांची उन्नती होणे शक्य नाही हे बाबासाहेबांनी आधीच ओळखले होते , म्हणूनच त्यांनी शिक्षणावर अधिक भर



दिलेला होता. शिक्षण घेवून दलित वर्ग जागृत झाला , प्रस्थापित व्यवस्थेच्या विरूध्द जर आता लढायचे असेल तर, लेखणीशिवाय पर्याय नाही. म्हणजेच विचाराची लढाई लढण्याचा सल्ला त्यावेळी बाबासाहेबांनी दिला होता. भगवान भोईर नावाचा कवी आपल्या " धार" नावाच्या कवितेत बाबासाहेबांच्या विचारांची नविन दृष्टी घेवून म्हणतात,

"बा, रापी खाली घे
बाबासाहेबांनी आपल्या हाती
लेखणी दिलीय
आता रापीची धार लेखणीला आलीय ."

पारंपारिक आणि बोथट झालेले विचार आता बाजूला सारून नव्या दमाचे विचार समाजात पेरण्याची वेळ आलेली आहे. अज्ञान, दारिद्रय, अंधश्रध्दा, आणि शोषण नाकारून लोकशाहीचे प्रकाशपर्व निर्माण करण्याची गरज आज आहे. फक्त निर्माण करणेच नाही तर, ती गतीमान कशी होईल यासाठीही प्रत्येकाने प्रयत्न करावा लागेल.

अलीकडे आरक्षणाच्या संदर्भात भलतीच चर्चा होतांना दिसते. आरक्षण देवून ज्यांचा विकास करायचा होता, त्यांच्यापर्यंत खऱ्या अर्थाने आरक्षणच पोहचलेले नाही. आदिवासी कवी कृष्णकुमार चांदेकर यांनी आपल्या "पतूसा" नावाच्या काव्यसंग्रहात "आरक्षण" या कवितेत हा मुद्दा जहाल पध्दतीने मांडलेला आहे.

व्यवस्थेतील आर्थिक विषमतेची दरी नष्ट व्हावी यासाठी संविधानाने सामाजिक न्यायाच्या उदात्त हेतूनें दिलेले आरक्षण हे प्रस्थापितांना पचत नाही हा संस्कृती संघर्ष कृष्णकुमार चांदेकरांनी साध्या सोप्या शब्दात मांडलेला आहे.ते, म्हणतात,

"अजूनही माझी माय घरात नागवी राहून
लेकीला बाहेर पाठविते किंवा
लेकीला नागवी ठेवून माय घराबाहेर निघते
आणि, त्यांच्या दिवसातून दहा साडया फेरणाऱ्या मायलेकी
एकाच वेळी सिनेमात जावून बसतात
तरी भडवे म्हणतात,
यांना आरक्षणाची काय गरज."

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या सर्वांगिण प्रगतीचा, उन्नतीचा भला



Scanned by Scanner Go

## संपादक परिचय




नाव : प्रा. डॉ. भास्कर श्रावण गायकवाड

शै.पात्रता : एम.ए.,बी.एड्.,नेट,सेट,पीएच्.डी.

मराठी विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा. जि. लातूर


प्रकाशित ग्रंथरचना :

- आदिवासी भिल्लांची गाणी
- विचारांचे अमृतकण: व्हाट्सपायन

पुरस्कार :

- इन्साचा "विद्याभूषण पुरस्कार" २०१०
- महाराष्ट्र शि.समितीचा "उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार" २०१५
- म.फु.शि.परिषद, महाराष्ट्रचा राज्यस्तरीय "समाजरत्न नागरी पुरस्कार" २०१९

- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोध निबंध वाचन
- लहू शक्ती या मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून कार्य
- महाराष्ट्र महाविद्यालयाच्या "शिवनेरी" या वार्षिक अंकाचे संपादन

*"माझे सन्माननिय मित्र श्री. मुन्शी म्हणतात की, भौतिक लाभाच्या वाटपाचा प्रश्न असता तर सीनेटवर जमात निहाय प्रतिनिधित्वाच्या तत्वाचा त्यांनी सहज स्विकार केला असता, परंतु मी त्यांना जाणीव करून देऊ इच्छितो की, शिक्षण हा सर्वात महत्वाचा भौतिक लाभ आहे. याची मागासवर्गीयांना जाणीव झाली आहे. आमच्यासाठी शिक्षण हा सर्वात महत्वाचा भौतिक लाभ आहे. त्याकरीता आम्ही तीव्र संघर्षासाठी तयार आहोत. त्यासाठी आम्ही करेणत्याही प्रकारच्या भौतिक लाभाचा त्याग करु शकतो. या संस्कृतीने उपलब्ध करून दिलेल्या लाभाचा त्याग करावयाची आमची तयारी आहे पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाच्या हक्कांचा आम्ही त्याग करावयास तयार नाही."*

*(दि.०५ ऑक्टोबर १९२७- मुंबई, मुंबई विधिमंडळातील मुंबई विद्यापीठ कायदा दुरूस्ती विधेयकावरील चर्चेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणातून.)*


ISBN 978-93-83411-95-5


प्रेरणा महामानवाची

डॉ.भास्कर गायकवाड

# प्रेरणा महामानवाची

## डॉ.भास्कर गायकवाड



